# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

## प्रेस नोट

दि.१३.०१.२०२२

## पोलीस अधिक्षक कार्यालयातील ३०१ पोलीस अधिकारी अंमलदारांचे कोविड १९ बुस्टर डोस लसीकरण अभियान संपन्न.

***

कोविड – १९ विषाणूचा 'ओमीक्रॉन' नावाच्या नविन व्हेरीयंटचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून त्यावर प्रतिबंध व्हावा याउद्देश्याने महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे फ्रंटलाईन वर्कर यांना पहिला व दुसरा लसीचा डोस घेऊन नऊ महिन्यांचा कालावधी पूर्ण झालेल्या अधिकारी अंमलदार यांच्यासाठी वाशिम जिल्ह्याचे मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह(IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक कार्यालयातील कल्याण शाखेमार्फत कोविड – १९ विषाणू प्रादुर्भावास प्रतिबंध व्हावा यासाठी पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्यासाठी बुस्टर डोस लसीकरण कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वतः मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह(IPS) यांनी लसीकरण कॅम्पला भेट दिली व सर्वांनी सॅनिटायझर सहित मास्कचा वापर करणेसंदर्भात सूचना देऊन वेळेत लसीचे डोस घेण्याबाबत आवाहन केले. यावेळी पोलीस अधिक्षक कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सर्व शाखा, कार्यालय, पोलीस मुख्यालय तसेच पोलीस स्टेशन वाशिम शहर, वाशिम ग्रामीण येथील २६० पोलीस अधिकारी/अंमलदारांनी बुस्टर डोस लसीकरणाचा लाभ घेतला. याव्यतिरिक्त आजरोजी वाशिम जिल्हा पोलीस दलातील पोलीस स्टेशन अनसिंग येथील लसीकरण कॅम्पमध्ये १० पोलीस अधिकारी-अंमलदारांनी व पोलीस स्टेशन रिसोड येथील लसीकरण कॅम्पमध्ये ३१ पोलीस अधिकारी-अंमलदारांनी असे एकूण ३०१ अधिकारी-अंमलदारांनी बुस्टर डोस लसीकरणाचा लाभ घेतला. तसेच बुस्टर डोसच्या लसीकरणाचा कॅम्पचे आयोजन सर्व पोलीस स्टेशन स्तरावर करण्यात येत असून राहिलेले सर्व अधिकारी अंमलदार यांना बुस्टर डोस देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर बुस्टर डोस लसीकरण कॅम्पला मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह(IPS) यांचे मार्गदर्शनाखाली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.श्री.अहिरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मनीषा चव्हाण, डॉ.विरू मनवर, डॉ.अर्चना बोरकर, GNM स्वाती कांबळे, ANM शांता राठोड, दुर्गा मेश्राम, डाटा ऑपरेटर पुरुषोत्तम भालेराव, PO महेंद्र सावळे यांनी उपस्थित राहून लसीकरण पार पाडले. या अभियानाकरिता पो.नि.श्री.सुनील हूड, रापोनि.श्री.मांगीलाल पवार, पोउपनि. श्री.संतोष जंजाळ, रापोउपनि.श्री.किसन राठोड, ASI दिलीप घोडाम, ATCचे ASI मोहम्मद इद्रीस शेख, ASI शंकर सोळंके, HC अज्ञानसिंग ब्राम्हण, NPC प्रवीण शिरसाट, मोहम्मद मौसिक, आशिष जयस्वाल, PC अमीर खान, विठ्ठल सुर्वे या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी परिश्रम घेऊन सदरचे लसीकरण अभियान यशस्वीरीत्या पार पाडले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.

Scanned with CamScanner